वर्ष म्हणून साजरे केले जात होते. तसेच महाराजा किशनप्रसाद याच वर्षी सेवानिवृत्त होते होते. या सर्व परिस्थितीचा फायदा घेत, श्री. गुंडेरावांनी परिषदेचे अधिवेशन परतूर इथे घेण्याला परवानगी मिळवून दिली.

१ जून १९३७ रोजी हे अधिवेशन घेतले गेले. संपूर्ण मराठवाड्यातून अनुभवी पुढारी आणि तरुण कार्यकर्ते या अधिवेशनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. परिषदेच्या अध्यक्षपदी परभणी येथील श्री. गोविंदराव नानल यांची निवड झाली होती. त्यामुळे परभणीकरांवर अधिवेशनाची विशेष जबाबदारी होती. अधिवेशनाच्या स्वागत मंडळाच्या अध्यक्षपदी केंधळी येथील शेतकरी श्री. गोविंदराव घारे यांची नियुक्ती झाली होती. नानल आणि घारे यांची निवड हे अधिवेशन जनसामान्यांच्या प्रश्नांचा पाठपुरावा करणारे आहे, याचेच द्योतक होते.या अधिवेशनामध्ये स्थानिक समितीचे सचिव या नात्याने विठ्ठलराव देसाई सक्रिय राहिले. अधिवेशनानंतर संपूर्ण परतूर तालुक्यात, गावोगावी समित्या स्थापन करण्याचे काम श्री. विठ्ठलराव व श्री. सखारापंत खापरखुंटीकर यांच्यावर सोपवण्यात आले. या दोघांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी तालुकाभर फिरून १८/२० गावांमध्ये महाराष्ट्र परिषदेच्या शाखा स्थापन केल्या. गावन् गाव पिंजून कादून लढ्यासाठी लोकांची मनं तयार केली. सरकारच्या विरोधात बोलणंदेखील पाप आहे अशी समजूत असणाऱ्या गावकऱ्यांची मानसिकता बदलणं सोपं काम नव्हतं. आपल्यावर अन्याय होत आहे, आपले हक्क हिरावून घेतले गेलेत याची जाणीव या लोकांमध्ये नव्हती. पूर्वजन्माची, पूर्वकर्माची कर्म म्हणून हे जीवन आपल्या वाट्याला आले आहे अशी समजूत होती. सरकार म्हणजे माय-बाप ही भूमिका होती. साहजिकच मुकी बिचारी कुणी हाका ही स्थिती होती. अशी प्रजा जागवणे चेष्टेचे काम नव्हते, परंतु कार्यकर्त्यांचा निर्धार ठाम होता. झोपलेल्याला जागं करणं ते आपलं आद्य कर्तव्य मानत होते. जागृतीची ही ज्योत वि. वा. दसाई व त्यांच्या सहकाऱ्यांनी सेलू येथे १९४५ मध्ये झालेल्या महाराष्ट्र परिषदेच्या पाचव्या अधिवेशनात प्रतीकरूपाने नेली.

**सामाजिक कार्य :** सामान्य जनतेचे राजकीय भान जागवत असतानाच सामाजिक जीवनात त्यांनी एकोप्यानं वागावं यासाठी विठ्ठलराव प्रयत्नशील होते. साक्षरता अभियान, अस्पृश्योद्धार यांसारख्या कार्यक्रमांत ते हिरीरीने सहभाग